# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ११/०६/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. काटोल** – दिनांक १०/०६/२०२२ चे १८.३० वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादीयांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीने फिर्यादीचे मामा कडुन जावुन येतो असे आपले आजीला सांगीतले व ती निघुन गेली. फिर्यादी हे कामावरून परत आले व फिर्यादी यांनी आपले आई हीला विचारले की, मुलगी कुठे दिसत नाही आहे. यावर फिर्यादीचे आई म्हणाली ती, 'तुझ्या मामा कडे जातो असे म्हणुन गेली' तेव्हा फिर्यादी यांनी जावुन बघीतले असता फिर्यादी चे मामा म्हणाले ती इथे आलीच नाही. तीचा आजुबाजुला नातेवाइकांकडे शोध घेतला मिळुन आली नाही. तिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि पल्लवी काकडे या करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. भिवापुर** :– अंतर्गत मौजा मालेवाडा शिवार टायर कंपनी जवळ ता.भिवापुर जि.नागपुर येथे दिनांक १०/०६/२२ चे ०१.३० वा. सुमारास फिर्यादी सरतर्फे पोहवा विठ्ठल तितरमारे याची नाईट अधिकारी डयुटी सुरू असतांना पो.स्टे भिवापुर ला स्टेशन डायरी अंमलदार यांनी फोनद्वारे माहिती दिली की, मौजा मालेवाडा शिवारात अपघाताची घटना झाली आहे. अशा सुचनेवरून पो.स्टे. कन्हान चा स्टाफ घटनास्थळी गेले असता तेथे पिवळ्या रंगाचे १४ चक्का टिप्पर क्र. एमएच– ३३/टि–०५५५ व १६ चक्का ट्रक क्र. एमएच– ३४/डि.जी– ७३३४ असे अपघात स्थितीत दिसले. एमएच– ३४/डि. जी– ७३३४ चे वाहन चालक प्रत्यक्ष साक्षीदार नामे– संतोश मंयतराव कदम रा.राजुरा जि.चंद्रपुर यांना विचारपुस केले असता नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी संतोश मंयतराव कदम यांचे कोळश्याचा लोड भरून असलेला ट्रक ब्रेक डाउन असल्याने रस्तेचा बाजुला उभा ठेवला असतांनी मागुन येणाऱ्या वाहन ट्रक क्र एमएच– ३३/ टि– ०५५५ चा चालक आरोपी नामे– सुधाकर त्र्यंबक धोटे(मृतक), वय ३८ वर्ष, रा. मौसी खाब गडचिरोली याने मागुन जबर धडक दिली व तो स्वताचे मरणास कारणीभुत ठरला. प्रत्यक्षदर्क्षी साक्षदार व कंपनी चा लोकांचा बयानावरून व चौकशी अहवालावरून आपल्या ताब्यातील वाहन ट्रक क्र. एमएच–३३/टि.०५५५ हे भरधाव वेगाने व निश्काळजीपणाने चालवुन स्वता मरणास कारणीभुत ठरला व कंडक्टर यास जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा विठठल तितरमारे पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री श्यामजी भस्मे मो.क्र. ९७६४९४६८१० हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर